MHKO100006502022

नियमीत दिवाणी दावा क्र.१६९/२०२२ मध्ये निशाणी २०४ वर आदेश

सदर अर्ज प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ११४ व आदेश ४७ नियम १ प्रमाणे दिला आहे. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, वादी यांनी निशाणी १०० वर दिलेला अर्ज न्यायालयाने दिनांक ११.०२.१९८८ चा दस्त प्रतिवादी यांच्या ताब्यामध्ये असल्याची शक्यता आहे असे मत नोंदवून सदरचा मुळ दस्त प्रतिवादी यांनी दाखल करण्याबाबत भारतीय पुरावा कायदा कलम ६६ प्रमाणे आदेश पारीत करून मंजूर केला आहे. वादी यांच्या दाव्यात मुळ दस्त प्रतिवादी यांच्या ताब्यात आहे असे कथन नाही. याउलट प्रतिवादी यांनी त्याचे अस्तीत्व देखील नाकारले आहे. त्यामुळे न्यायालयाने निशाणी १०० वर पारीत केलेला आदेश सकृतदर्शनी चुकीचा आहे. वादी यांनी भारतीय पुरावा कायदा कलम ६६ प्रमाणे आदेश पारीत करावा अशी मागणी केली नसताना तसा चुकीचा आदेश पारीत केला आहे. वादी यांनी निशाणी १०० वरील अर्जामध्ये प्रतिवादी यांनी मुळ दस्त हजर करावा अशी मागणी केली होती. भारतीय पुरावा कायदा कलम ६६ अथवा दुय्यम पुरावाबाबत कोणतीही मागणी केली नव्हती. त्यामुळे भारतीय पुरावा कायदा कलम ६६ प्रमाणे मुळ दस्त हजर करण्याचा आदेश हा सकृतदर्शनी चुकीचा आहे. त्यामुळे त्या आदेशाची पुर्नविलोकन करण्यासाठी सदर अर्ज दाखल केला आहे.

२. सदर आदेश कायदयातील तरतुदींचे अवलोकन करताना झालेल्या चुकीमुळे पारीत झाला आहे. योग्य न्यायीक अर्थ काढण्यास चुक झाली असेल तर त्याचा परिणाम पक्षकारांना भोगावा लागू नये व झालेली चुक दुरूस्त करण्यात यावी असे स्पष्ट मत मा. वरिष्ठ न्यायालयाने व्यक्त केले आहे. न्यायालयाने न्यायालयाकडून अनावधानाने स्थापित कायदयाचे अर्थ लावण्यात चुक झाली आहे, परंतु त्याचे परिणाम प्रतिवादी यांना भोगणे भाग पडणार आहे. त्यामुळे अनावधानाने झालेली चुक दुरूस्त होवून मिळणेसाठी सदर अर्ज दाखल केला आहे. म्हणून निशाणी १०० वर पारीत केलेला आदेश रद्द करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

३. वादी यांनी सदर अर्जास निशाणी २०५ वर म्हणणे दाखल केले आहे. त्यांने असे

कथन केले आहे की, दिनांक ११.०२.१९८८ चा दस्त व वादी यांनी केलेला पुरावा याची पाहणी करून निशाणी १०० वर कायदेशीर आदेश केला असून तो बरोबर आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी दाखल केलेला अर्ज खर्चासह फेटाळणेत यावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

४. दोन्ही बाजूंचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी तर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम १४ नुसार दाव्यात दि.११.०२.१९८८ चा दस्त प्रतिवादीच्या ताब्यात आहे असे कथन केले नाही. वादीने नि.१०० वरील अर्जात त्यांना सदर दस्ताचा दुय्यम पुरावा वादीस करण्याचा आहे असे नमुद केले नाही. सदर मुळ दस्त प्रतिवादी यांच्या ताब्यात आहे असे गृहित धरल्यास व तो दस्त प्रतिवादीकडे नसल्याने त्याने तो न्यायालयात दाखल केला नाही तर प्रतिवादी विरूध्द प्रतिकुल अनुमान काढले जाईल. त्यामुळे प्रतिवादीचे नुकसान होणार आहे. प्रतिवादीस न्याय्य संपरिक्षा मिळणार नाही. त्यामुळे निशाणी १०० वरील आदेश रदद करणेत यावा, अशी विनंती त्यांनी केली.

वादी तर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, निशाणी १०० वरील अर्जास म्हणणे देताना दि.११.०२.१९८८ रोजीचा दस्त त्यांच्या ताब्यात नाही, असे नमुद केले नाही. नि.१०० वरील आदेश हा अभिलेखावरील कथन व पुरावा ध्यानात घेउन केला आहे व तो बरोबर आहे. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती त्यांनी केली.

५. वादीने दिनांक ११.०२.१९८८ रोजीचा दस्त प्रतिवादीच्या ताब्यात आहे असे कथन दाव्यात केले नसले तरी तो दस्त वादी व प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार यांच्या दरम्यान झाला आहे असे कथन वादींनी दाव्यात केले आहे. वादीने दाव्यात तसे कथन केले नाही म्हणून तो निशाणी १०० वरील अर्ज दाखल करू शकत नाही असा अर्थ होत नाही. वादीने दाव्यात तो दस्त प्रतिवादीच्या ताब्यात आहे असे कथन केले असते तरी असा कोणताही दस्त झाला नाही असे कथन प्रतिवादी लेखी कैफियतीमध्ये करू शकतात आणि त्यांनी तसे कथन लेखी कैफियतीमध्ये केले आहे. प्रतिवादी यांनी निशाणी १०० वरील अर्जास म्हणणे देताना सदर दस्त प्रतिवादींच्या ताब्यात नाही असे कथन केले नाही. सदर दस्त सिध्द करण्याची जबाबदारी वादीवर आहे व ती जबाबदारी प्रतिवादीवर ढकलणे कायदेशीरदृष्टया चुकीचे आहे, असे कथन प्रतिवादीने त्यांच्या म्हणण्यात केले आहे.

६. वादीने निशाणी १०० वरील अर्जात भारतीय पुरावा कायदा कलम ६६ किंवा दुय्यम पुरावा देण्याबाबत उल्लेख केला नसला तरी दिनांक ११.०२.१९८८ चा दस्त

प्रतिवादीच्या ताब्यात आहे व तो प्रतिवादीस अभिलेखावर दाखल करण्याबाबत आदेश व्हावा असे नमूद केले आहे. केवळ कायदयातील कलम नमूद केले नाही म्हणून वादीने तशी मागणी केली नाही असा अर्थ होत नाही. सत्य वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणे हे न्यायप्रक्रियेचे उददीष्ट असते. दिवाणी प्रक्रिया संहितेमधील तरतुदी हया न्यायास सहाय्य करण्यासाठी आहेत. वादीने अर्जात भारतीय पुरावा कायदा कलम ६६ चा उल्लेख केला नाही, केवळ या कारणावरून त्यांनी केलेली मागणी चुकीची आहे असे म्हणता येणार नाही. वादीने निशाणी १०० वरील अर्ज न्यायालयात दिला आहे, त्यामुळे भारतीय पुरावा कायदा कलम ६६ नुसार वेगळी नोटीस प्रतिवादीस देण्याची गरज नाही. सदर दस्तावर वादीचा दावा आधारित आहे याची माहिती प्रतिवादीस आहे. तो दस्त प्रतिवादींचे पुर्व हक्कदार यांच्या ताब्यात होता, त्यामुळे त्याचे विषयी प्रतिवादीस काही माहिती नाही, असा प्रतिवादीतर्फे युक्तीवाद संयुक्तिक वाटत नाही.

७. दि.११.०२.१९८८ रोजीच्या दस्तात तो मुळ दस्त प्रतिवादी यांचे पुर्व हक्कदार यांच्या ताब्यात आहे, असा मजकूर वाचला म्हणजे त्या दस्तातील मजकूर पुराव्यात वाचला असा अर्थ होत नाही. सदर मजकूर हा निशाणी १०० वरील अर्जावर निर्णय देण्यासाठी वाचला आहे.

८. अभिलेखावरील कथन व पुरावा याचे अवलोकन केल्यानंतर निशाणी १०० वरील आदेश पारीत केला आहे. त्यामुळे तो आदेश सकृतदर्शनी चुकीचा आहे असे मला वाटत नाही. सदर अर्ज करण्यास प्रतिवादीस पुरेसे कारण नाही. त्यामुळे सदर अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. त्यानुसार मी खालील आदेश पारीत करीत आहे.

आदेश

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2025.09.24 15:31:08 +0530

दिनांक २३.०९.२०२५

डी. एम. पवार
२रे दिवाणी न्यायाधीश क.स्तर
गडहिंग्लज